**MHKO**020019042020

**नियमित दिवाणी दावा क्र. ६४६/२०२० मधील**

**निशाणी क्र. ०९ वरिल आदेश**

**अमित पाटील / भगवंतराव माने व इतर**

१. हा अर्ज प्रतिवादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ प्रमाणे दाखल करुन दावा रद्द करावा अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादींनी सदरचा दावा हा त्यांची बदनामी झालेने प्रतिवादी यांचेकडून नुकसान भरपाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. परंतु, वादींनी मागणी केलेल्या रक्कमेप्रमाणे या दाव्याला योग्य तो न्यायालयीन मुद्रांक लावलेला नाही. वादींची नुकसान भरपाई मागणी रक्कम रुपये ५०,००,०००/– इतकी आहे. त्यामुळे, सदर रक्कमेवर वादींनी न्यायालयीन मुद्रांक लावणे गरजेचे असताना वादींनी योग्य तो न्यायालयीन मुद्रांक लावलेला नाही. त्यामुळे, सदरचा दावा नाकारणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीने याच अर्जाचे मागे म्हणणे दाखल करुन अर्जामधील सर्व कथने नाकारलेली आहेत. वादींनी सदरचा दावा हक्कज्ञापन व आज्ञार्थी आदेश होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींनी दाव्यामध्ये कोठेही वादींची बदनामी केली म्हणुन प्रतिवादीकडून पन्नास लाख रुपयांची मागणी केलेली नाही. तसेच प्रतिवादी यांनी वादींची बदनामी केल्याचे घोषीत होऊन मिळणेची मागणी केली आहे. तसेच

प्रतिवादींनी वादींची बदनामी केली आहे किंवा कसे याबाबत मे.कोर्टांनी निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे, सदर दाव्याच्या अंतीम निर्णयामध्ये प्रतिवादींनी वादींची बदनामी चे नुकसान भरपाई बाबत जी रक्कम मे. कोर्ट ठरवेल त्यावर वादींना त्याप्रमाणे न्यायालयीन मुद्रांक लावणेचा आदेश करु शकतात.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी देखील वादींचे विरुध्द २७९/२०२२ हा दावा रक्कम रुपये पन्नास लाख बदनामीची रक्कम वसुल होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्या दाव्यामध्ये सुध्दा प्रतिवादींनी सदर रक्कमेवर न्यायालयीन मुद्रांक दिलेला नाही. सदरचे दोन्ही दावे एकत्रीत चालणे आवश्यक आहे. प्रतिवादींनी केवळ या दाव्याचे कामकाज लांबवणेसाठी हा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्याचा गुणदोषावर निर्णय झालेनंतर मा. न्यायालयाचे आदेशान्वये नियमाप्रमाणे होणारा न्यायालयीन मुद्रांक लावणेस वादी तयार आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज नांमजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

५. हा अर्ज निकाली काढणेपूर्वी मी प्रतिवादीतर्फे श्रीयुत एस.डी. कुलकर्णी व वादी तर्फे श्रीयुत के.जी. पाटील वकिलांचा युक्तीवाद श्रवण केला. तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले.

६. अर्जाचा गुणदोषावर विचार करणेपूर्वी दिवाणी प्रकिया संहितेतील आदेश ७ नियम ११ ची तरतुद नमुद करत आहे.

**11. REJECTION OF PLAINT** – The plaint shall be rejected in the following cases -

(a) where it does not disclose a cause of action;

(b) where the relief claimed is undervalued and the plaintiff on being required by the Court to so correct the valuation within a time to be fixed by the court, fails to do so;

(c) where the relief claimed is properly valued, but the plaint is

written upon paper insufficiently stamped and the plaintiff, on being required by the court to supply the requisite stamp-paper within a time to be fixed by the court, fails to do so;

(d) where the suit appears from the statement in the plaint to be barred by any law;

(e) where it is not filed in duplicate;

(f) where the plaintiff fails to comply with the provisions of rule 9;

७. वरिल तरतुदीचा वाचन केले असता असे दिसनु येते की, वादीचा दावा हा दाव्यास कारण घडले नसेल तर काढुन टाकणेस पात्र असतो. कायद्यातील प्रचलित तरतुदीप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ च्या अर्जाच्या वेळी वादीने दाखल केलेल्या दाव्याचे सखोल अवलोकन करणे आवश्यक व गरजेचे असते. तसेच प्रतिवादींनी दाखल केलेली कैफीयत अगर कागदपत्रे विचारात घेता येत नाहीत. त्याकरिता वादींनी दाखल केलेला दावा हा संपूर्ण विलगीकरण न करता संपूर्ण पणे वाचणे गरजेचे असते.

८. वरिल तरतुद विचार घेतली. वादीने सदरचा दावा हा हक्कज्ञापन तसेच आज्ञार्थी आदेशासाठी दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादींनी दिनांक १९/४/२०२० रोजी दैनिक पुढारी मुख्य आवृत्तीमधुन प्रसिध्द केलेल्या जाहिर नोटीसीतील संपुर्ण मजकुर खोटा चुकीचा व बेकायदेशीर आहे. वादींच्या कथनांप्रमाणे वादी नं.१ व २ हे आपआपल्या क्षेत्रात प्रतिष्ठीत व्यक्ती आहेत. प्रतिवादी हे अशा प्रकारची जाहीर नोटीस दिल्या कारणाने वादींना त्यांचे माहितीतील अन्य व्यक्तींनी फोन करुन तसेच भेटून विचारण केली आहे. त्यामुळे, वादींची नाहक बदनामी झाली.

९. त्यानंतर वादींनी दिनांक १८/६/२०२० रोजी प्रतिवादी यांना दैनिक पुढारी मध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करुन वादींच्या केलेल्या बदनामीबाबत

अब्रुनुकसानीची भरपाई मागणी व वादी यांची दिवाणी व फौजदारी स्वरुपाची बदनामी केली याबाबत नोटीस पाठविली. त्याप्रमाणे प्रतिवादींनी ती नोटीस स्वीकारली. परंतु, वादींना कोणत्याही प्रकारचे उत्तर दिले नाही. त्या कारणाने वादींना सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द दाखल करणे भाग पडले आहे.

१०. वादीच्या वकिलांनी असे कथन केले आहे की, त्यांनी त्यांच्या दाव्यामध्ये प्रतिवादीकडून कोणतीही रक्कम वसुल करुन मागितलेली नाही. त्यांचा दावा हा हक्कज्ञापन व आज्ञार्थी आदेशासाठी दाखल केलेला आहे. या करिता वादीच्या दाव्याचे पुन्हा अवलोकन केले. त्यामध्ये दावा कलम १० मध्ये असे नमुद आहे की, ''प्रतिवादी यांनी हेतुपुरस्कर समजुन ऊमजून अक्कल हुशारीने कोणत्याही सबळ पुराव्या अभावी व वादींची समजातील जन माणसातील असणारी पत अब्रु याचे नुकसान केले आहे असे हक्कज्ञापन होऊन मिळणेसाठी तसेच प्रतिवादी यांना जास्तीत जास्त दिवाणी स्वरुपाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावणेसाठी तसेच नुकसान भरपाईची रक्कम नोटीसीमध्ये वादींनी मागणी केल्या प्रमाणे प्रतिवादीकडून वसुल होऊन मिळावी यासाठी वादी प्रस्तुतचा दावा दाखल करत आहेत.''

११. तसेच पुढे वादीच्या दाव्यातील विनंती कलम १६ चे अवलोकन केले त्यामध्ये वादींच्या विनंत्या खालीलप्रमाणे –

अ. प्रतिवादी यांनी वादीची समाजातील जन माणसातील असणारी पत, अब्रु याची नुकसानी करुन बदनामी केली आहे असे घोषीत होऊन असे हक्कज्ञापन मिळावे व तसा हुकुमनामा व्हावा.

ब. प्रतिवादी यांनी वादीची समाजातील जन माणसातील असणारी पत, अब्रु याची नुकसानी करुन बदनामी केली म्हणुन प्रतिवादी यांस जास्तीत जास्त दिवाणी स्वरुपाच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावणेत यावी व तसा हुकुमनामा होऊन

मिळावा.

क. प्रतिवादी यांनी वादीची समाजातील जन माणसातील केलेली बदनामी व त्यामुळे गेलेली अब्रु याची नुकसान भरपाईची रक्कम नोटीसीमध्ये वादींनी मागणी केल्याप्रमाणे प्रतिवादींनी वादीला अब्रुची नुकसान भरपाई म्हणुन द्यावी असा अज्ञार्थी आदेश प्रतिवादीस व्हावा असा हुकुमनामा होऊन मिळावा.

१२. वादीच्या दाव्यातील विनंती कलम–क पाहता मला वादींनी नि.क्र.३/१ कडील प्रतिवादींना पाठविलेली नोटीस वाचणे गरजेचे आहे. सदर नोटीसीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडे रक्कम रुपये पन्नास लाख इतकी रक्कम मानहानी व बदनामीची नुकसान भरपाई देणेची मागणी केलेली दिसुन येते.

१३. त्यामुळे, मी महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट कलम ६ (i) ची तरतुद नमुद करत आहे.

महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट कलम ६ (i) Computation of Fees payable in certain suit–

The amount of fee payable under this act is the suits next hereinafter mentioned shall be computed as follows –

i) In a suits for money (including suits for damages or compensation or arrears of maintenance, of annuities of other sums payable periodically) – according to the amount claimed.

१४. वरिल तरतुदीप्रमाणे व वादीच्या दाव्याप्रमाणे वादी हा प्रतिवादीकडून नुकसान भरपाई मिळावी म्हणुन पन्नास लाखाची मागणी केल्याचे दिसुन येते. त्यामुळे,

वादीने त्या रक्कमेवर कोर्ट फी भरणे आवश्यक आहे. सबब, न्यायाचे दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी चा नि.क्र. ९ चा अर्ज खालील अटी व शर्तीवर मंजुर करणेत येत आहे.

२. वादीला असा आदेश देणेत येतो की, या आदेशाच्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत महाराष्ट्र न्यायालय फी अधिनियम, 1959 च्या कलम 6 (i) नुसार नुकसान भरपाईच्या मागणी रक्कमेच्या वसुलीसाठी वादीने कोर्ट फी स्टॅम्प भरावा, असे न केल्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अंतर्गत दावा नाकारला जाईल व त्यास वादी जबाबदार असेल.

३. उक्त आदेशाचे पालन केल्यानंतर, जर या न्यायालयाचे आर्थिक अधिकार क्षेत्राबाहेर गेलेस तर त्याप्रमाणे नि.क्र. १ वर आदेश पारित केला जाईल याची नोंद घ्यावी.

४. सदर अर्जाचा खर्च दाव्याचे निकालावर अवलंबुन राहील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VINAYA VISHWANATH GIRAM
Date: 2024.08.28 13:40:49 +0530

कोल्हापूर.
दिनांक – २६/०८/२०२४

(विनया वि. गिराम)
१०वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कोल्हापूर.